श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास (प्रभादेवी) मुंबई
S.K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-28
☎ : 022-62491111 / 62491112
(Controlled by Govt. Of Maharashtra)
www. siddhivinayak.org
email :admin@siddhivinayak.org
info@siddhivinayak.org

# " शुध्दीपत्रक "

दि. ३० जानेवारी, २०२५ ते दि. ०४ फेब्रुवारी, २०२५ या कालावधीत साजरा करण्यात येणाऱ्या 'माघ गणेशोत्सव' कालावधीत विद्युत रोषणाई करणे, सांस्कृतिक कार्यक्रमासाठी साऊंड सिस्टिम भाडेतत्वावर घेणेबाबत तसेच गुढीपाडवा २०२५ साठी विद्युत रोषणाई करणेबाबत इ. कामासाठी न्यासाच्या संकेतस्थळावरुन दरपत्रके मागविण्यात आले आहेत.

सदर दरपत्रक सूचनेमध्ये पुरवठादाराने सादर करावयाच्या कागदपत्रांमध्ये कंपनी नोंदणी प्रमाणपत्र देणे बंधनकारक आहे ही अट समाविष्ट करण्यात येत आहे. याबाबतची सुधारीत दरपत्रक सूचना न्यासाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

Vpatil
( वीणा पाटील )
कार्यकारी अधिकारी

प्रभादेवी, मुंबई
२१/०१/२०२५

श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास (प्रभादेवी) मुंबई

S.K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-28
: 2422 4438, 2422 2072 Fax : 2422 1558

(Controlled by Govt. Of Maharashtra)
www.siddhivinayak.org
e-mail : svt@vsnl.com

दिनांक : २१.०१.२०२५

## सुधारीत दरपत्रके मागविण्यासंदर्भातील सूचना

विषय : माघ श्रीगणेश जयंती २०२५ निमित्त मंदिरातील विविध सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी साऊंड सिस्टिम भाडेतत्वावर घेण्याबाबत.

माघ श्रीगणेश जयंती २०२५ निमित्त मंदिरातील विविध सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी साऊंड सिस्टिम भाडेतत्वावर घेण्याबाबत सिलबंद दरपत्रके मागविण्याबाबतची संपूर्ण माहिती, अटी व शर्ती न्यासाच्याwww.siddhivinayak.orgया संकेतस्थळावर अपलोड करण्यात आली आहे.

अटी व शर्ती –

१. सिलबंद लखोटयावर ठळक अक्षरात दरपत्रकाचा विषय स्पष्टपणे नमूद करावा. तांत्रिक दरपत्रक तपशील व मूल्य दरपत्रक तपशील इच्छूक व्यक्ती/एजन्सी/कंपनी यांनी आपली वैयक्तीक माहिती, कंपनी नोंदणी प्रमाणपत्र/उद्यम प्रमाणपत्र/गुमास्ता प्रमाणपत्र मोबाईल क्रमांक याप्रमाणे दोन वेगवेगळया लखोटयामध्ये भरुन लाखेने सिलबंद करुन दि.२४/०१/२०२५ रोजी सकाळी ०३.३० वाजेपर्यंत न्यासाच्या प्रतिक्षालय इमारतीमधील तळ मजला आवक जावक नोंदणी शाखेत सादर करावी.

२. दरपत्रक भरतांना सर्व प्रकारचे कर मिळून एकत्रित एकूण रक्कम भरावी. दरपत्रक भरताना न्यासाने दिलेल्या दरपत्रकात भरून देणे आवश्यक व गरेजेचे आहे. न्यास दरपत्रकात दर भरून न दिल्यास सदर कंपनीस अपात्र ठरविण्यात येईल.

३. आपल्या क्षेत्रात करीत असलेल्या कामाचा २–३ वर्षाचा अनुभव असल्याबाबतची प्रमाणपत्रे सादर करावी.

४. मागील ३ वर्षाची सरासरी आर्थिक उलाढाल कमीत कमी १० लक्ष असावी. याबाबत सनदी लेखापाल (सीए) यांचे प्रमाणपत्र आवश्यक. इनकम टॅक्स रिर्टन (आयटीआर) सादर केल्यास ते ग्राहय धरण्यात येणार नाही.

५. दरपत्रकधारकाचे कार्यालय न्यास कार्यालयापासून २०–२५ किमी अंतरावर असणे आवश्यक आहे. जेणेकरुन न्यासास त्वरीत सेवा उपलब्ध करुन देणे शक्य होईल.

६. आपण केलेल्या कामाचा सविस्तर तपशिल व छायाचित्र देयकासोबत जोडण्यात यावी. अन्यथा देयके अदा केले जाणार नाही.

७. मान्य दरामध्ये कोणत्याही कारणास्तव भाववाढ दिली जाणार नाही/मागता येणार नाही.

८. आपणास दिलेल्या वेळेनुसार काम पूर्ण न केल्यास संबंधितांवर नियमांप्रमाणे कडक कार्यवाही करण्यात येईल.

श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास (प्रभादेवी) मुंबई
S.K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-28
: 2422 4438, 2422 2072 Fax : 2422 1558
(Controlled by Govt. Of Maharashtra)
www.siddhivinayak.org
e-mail : svt@vsnl.com

९. काम सुरू करण्यापूर्वी कोणतेही आगाऊ प्रदान केले जाणार नाही. न्यासाच्या परवानीशिवाय कोणतेही अतिरिक्त काम करण्यात आल्यास केलेल्या कामाचा जादा मोबदला आपणास देण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी. काम पूर्ण केल्यानंतर न्यासास बिल सादर करताना बिलासोबत पॅनकार्ड/जीएसटी क्रमांकाचा तपशील व कंपनीच्या बॅकेचा तपशील (बॅकेचे नांव, खाते क्र., आयएफएसी कोड ) जोडावा.

१०. कर्मचारी भरपाई अधिनियम १९२३ या कायद्याअंतर्गत आपणावर सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहतील.

११. माहितीची आवश्यकता असल्यास श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई कार्यालयात दूरध्वनी क्र. ०२२–६२४९११११/१११२ वर न्यासाचे पर्यवेक्षक, देखभाल व दुरूस्ती विभाग यांच्याशी संपर्क साधावा.

१२. नियमानुसार आवश्यक आयकर रक्कमेची कपात करणेत येईल. तसेच सर्व प्रकारचे कर अदा करणेची जबाबदारी दरपत्रकधारक यांची राहील.

१३. दरपत्रकधारकाने GST क्रमांक व PAN कार्ड दरपत्रकांत नमूद करावा व दरपत्रकासोबत जोडावा.

१४. दि.२४/०१/२०२५ रोजी दुपारी ०३.३० वाजता दरपत्रके उघडण्यात येतील. दरपत्रके उघडताना दरपत्रकधारकाने सदर दिवशी उपस्थित रहाणे आवश्यक आहे. दरपत्रकधारक दरपत्रके उघडताना उपस्थित न राहिल्यास दरपत्रक उघडल्यानंतर आपले कोणतेही म्हणणे मान्य केले जाणार नाही. दरपत्रके उघडल्यानंतर दरपत्रकामध्ये कोणतेही बदल करण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

Patil

कार्यकारी अधिकारी

श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास (प्रभादेवी) मुंबई

S.K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-28
: 2422 4438, 2422 2072 Fax : 2422 1558

(Controlled by Govt. Of Maharashtra)
www.siddhivinayak.org
e-mail : svt@vsnl.com

## दरपत्रकाचा तपशील

विषय : माघ श्रीगणेश जयंती दि. ३० जानेवारी, २०२५ ते दि. ०४ फेब्रुवारी, २०२५ या कालावधीत उत्सवानिमित्त मंदिरातील विविध सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी साऊंड सिस्टिम भाडेतत्वावर घेण्याबाबत.

नाव:-----------------------------------------------------------

पत्ता:-----------------------------------------------------------

-----------------------------------------------------------

कंपनी नोंदणी क्रमांक : ............... जीएसटी क्रमांक : .............. पॅन कार्ड क्रमांक : ......................

| अ.क्र. | तपशील | नग | दर (सर्व करांसहित) |
|---|---|---|---|
| 1 | Tower Speaker | 2 nos. | |
| 2 | Sub Speaker | 2 nos. | |
| 3 | Console- Digital/Anolog 22 Channels | | |
| 4 | Stage Monitors | 4 nos. | |
| 5 | Mic cables | 22 nos. | |
| 6 | Big Mic Stand/ Small Mic Stand | 15 nos. | |
| 7 | Cordless Mic – shure/sehnhessier | 2 nos. | |
| 8 | Cordiod Microphones | 22 nos. | |
| 9 | Lineout cables | 10 nos. | |
| 10 | Di Box | 4 nos. | |
| | एकुण रक्कम (सर्व करांसहित) | | |

दरपत्रकधारकाची सही व शिक्का